**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

**Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik**
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : director.ast@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2231473

विज्ञान विद्याशाखा / School of Sciences

# अहवाल

## राष्ट्रीय विज्ञान दिवस २०२६ निमित्त आयोजित वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धा




**राष्ट्रीय विज्ञान दिवस २०२६** निमित्ताने आयोजित **वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेचे** पोस्टर

© School of Sciences, YCMOU, Nashik. All rights reserved. This may not be reproduced, distributed, or used in any form without prior permission from the School of Sciences.

**स्पर्धेचे आयोजन**

राष्ट्रीय विज्ञान दिन २०२६ च्या निमित्ताने विज्ञान विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या वतीने 'वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धा' आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा विशेषतः विद्यापीठातील कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेसाठी इच्छुक सहभागींनी आपली नोंदणी करण्यासाठी गुगल फॉर्मच्या माध्यमातून अर्ज भरले. प्राप्त नोंदणींमधून एकूण सहा गटांची निवड करण्यात आली आणि प्रत्येक गटामध्ये चार सदस्यांचा समावेश करण्यात आला.

**स्पर्धेची सुरुवात व सूचना**

ही स्पर्धा राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या एक दिवस आधी म्हणजेच २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली. दुपारी २:४५ वाजता सर्व सहभागी गटांना शैक्षणिक इमारतीतील सभागृहात एकत्रित करण्यात आले. येथे स्पर्धेचे नियम, स्वरूप आणि खेळण्याची पद्धत याबाबत सर्वांना सविस्तर सूचना देण्यात आल्या. स्पर्धेची वेळ दुपारी ३:०० ते ४:१५ अशी निश्चित करण्यात आली होती.

**स्पर्धेची रचना व पद्धत**

या वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेमधील सर्व संकेत हे विद्यापीठ परिसरातील विविध वास्तू, स्थळे आणि त्यामागील वैज्ञानिक संकल्पनांशी संबंधित होते. स्पर्धेची सुरुवात शैक्षणिक इमारतीतील सभागृहातून करण्यात आली आणि प्रत्येक गटाला पहिला संकेत यादृच्छिक (Random) पद्धतीने देण्यात आला. त्या संकेताचे उत्तर शोधून संबंधित स्थळी जाऊन पुढील संकेत मिळवायचा होता. या स्पर्धेत एकूण सहा स्तर ठेवण्यात आले होते. पहिल्या चार स्तरांमध्ये प्रत्येक गटाला वेगवेगळे संकेत देण्यात आले होते. पाचव्या स्तराचा संकेत मात्र सर्व गटांसाठी समान ठेवण्यात आला होता, ज्याचे उत्तर शोधून सर्व गटांना शैक्षणिक इमारतीतील संगणक प्रयोगशाळेत पोहोचायचे होते. शेवटचा संकेत संगणक प्रयोगशाळेत ठेवण्यात आला होता. जो गट सर्वप्रथम हा अंतिम संकेत प्राप्त करेल, तोच गट या स्पर्धेचा विजेता ठरणार होता.

**स्पर्धेतील सहभाग व अनुभव**

सर्व सहभागी गटांनी उत्साहाने आणि कौशल्याने ही स्पर्धा खेळली. संकेतांचा उलगडा करताना त्यांनी विद्यापीठ परिसरातील विविध स्थळांना भेट दिली. अनेक कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ परिसरात कार्यरत असूनही काही ठिकाणांना प्रथमच भेट दिल्याचा अनुभव व्यक्त केला. या उपक्रमामुळे खेळाचा आनंद तर मिळालाच, शिवाय विद्यापीठ परिसरातील विविध ठिकाणांमागील विज्ञान समजून घेण्याची एक वेगळी संधीही मिळाली.

**स्पर्धेचा निकाल व पारितोषिक वितरण**

या स्पर्धेमध्ये गट क्रमांक ४ ने अत्यंत चातुर्याने आणि वेगाने सर्व संकेतांचा उलगडा करत अंतिम स्तर गाठला आणि विजेतेपद मिळविले. स्पर्धेतील विजेत्या गटातील प्रत्येक सदस्याला राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या नावासह विशेषरित्या सानुकूलित केलेले टेबल टॉप घड्याळ हे पारितोषिक मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू तसेच मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या प्रकारे आयोजित केलेल्या वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेमुळे विज्ञानाची जाणीव ठेवत एक आनंददायी आणि ज्ञानवर्धक अनुभव सर्व सहभागींसाठी निर्माण झाला.

# वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेतील सहभागी गट

| गट | विद्याशाखा/ विभाग | सदस्य |
|---|---|---|
| १ | विद्यार्थी सेवा विभाग | डॉ. पूनम प्रकाश वाघ |
| | निरंतर विद्याशाखा | सोनाली राजेश पाटील |
| | वाणिज्य विद्याशाखा | डॉ. संगीता वाणी |
| | अंतर्गत गुणवत्ता आश्वासन विभाग | डॉ. ज्योती पाटील |
| २ | प्रा.राम ताकवले संशोधन आणि विकसन केंद्र | डॉ. वासुदेव विक्रम राउत |
| | | डॉ. सचिन अशोक पोरे |
| | | राधिका शिंदे |
| | स्कूल ऑफ डिजिटल एजुकेशन | डॉ. विद्या आहिरे |
| ३ | मूल्यमापन विभाग | मोनिया कदम |
| | | ऐश्वर्या गोखले |
| | | कांचन प्रशांत कासाव |
| | | वाघेरे दर्शना तुकाराम |
| ४ | मूल्यमापन विभाग | अंकिता मोरे |
| | | रविंद्र कौतिक मारसाले |
| | | राहुल बाळासाहेब राउत |
| | | डॉ. अंकिता दीपक महाले |
| ५ | मानव्य विद्या व सामाजिक शास्त्र विद्याशाखा | डॉ. बरोडकर |
| | | साहीन शैख |
| | व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा | सुजाता मोरे |
| | प्रा.राम ताकवले संशोधन आणि विकसन केंद्र | साधना तांदळे |
| ६ | आरोग्य विज्ञान विद्याशाखा | किशोर राठोड |
| | | डॉ. आनंद सुकेणकर |
| | | डॉ. दिगंबर गाडे |
| | | गणेश कांबळे |

# वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेची छायाचित्रे





वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेच्या सूचना, रचना, कार्यपद्धती व नियम समजावून सांगताना...










वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेदरम्यानचे छायाचित्रे





संगणक प्रयोगशाळेत अंतिम संकेत प्राप्त करून विजयी ठरलेला गट आनंद व्यक्त करताना...



वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेतील विजेता गट




मा. कुलगुरू महोदय आणि उपस्थित मान्यवर विजेता गटास पारितोषिक प्रदान करताना...

## वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धेतील काही निवडक संकेत

संख्या येथे बोलतात माणूस नाही
कार्डच्या स्पर्शाने उघडते तिजोरी काही
अंकांच्या भाषेत व्यवहार चालतो
यंत्र चलन मोजते, पण विश्वास माणूस ठेवतो
क्षणात देवाणघेवाण पूर्ण होते इथे
पुढचा संकेत लपलेला आहे जवळच कुठे!

स्थिर उभे रूप पण विचार अजून प्रवाही
धातूच्या शांततेत ज्ञानाची ऊर्जा वाही
एका नव्हे अनेक विद्यापीठांचा तो केंद्रबिंदू
अंतर मिटवून शिक्षणाला दिले नवे सिंधू
माझ्याच सान्निध्यात पुढचा संकेत राही
शोध घेत पुढे चला तो दडलेला याच ठायी

उष्णतेच्या स्पर्शात पहाटे ऊर्जा जागी
द्रवांचे रुपांतर होई सुवास दरवळू लागी
धान्यांच्या अभिक्रियेत सकाळची सुरुवात
दुपारी संतुलित थाळीत पोषणाचे गणित जुळतात
चवीत आणि पोषणात येथे समतोल साधतो
पुढचा संकेत याच सुगंधी वाटेवर सापडतो

पडदे उजळतात पण कोड इथे झोपले
संकेतांची देवाणघेवाण विचारांना जोडले
यंत्रे शांत बसली चर्चा मात्र चालू
जिथे संगणक असतात पण निर्णय होतात बहु
विचारांच्या ठिणग्यात नवे मार्ग खुलेल
पुढचा संकेत याचदिगीता डिजीटल  दालनात सापडेल

चेहरा आणि ठसा सांगतो ओळखीची खुण
यंत्र वाचते नमुना अचूकतेचा गुण
दोन वेळा हजेरी काळाने ठरवले क्षण
सकाळ संधेला विद्याशाखेंच्या सहवासात नोंदवते वेळेचे गणन
वेळेच्या शिस्तीत बांधतो दिवसाचा क्रम
पुढचा संकेत दडलेला याच ठिकाणी शोधा पुढचे चरण

इथे आवाज घडतो तरंगांच्या नादात
प्रकाश बंदी होतो अचूक फ्रेमच्या रचनात
यंत्र, कॅमेरे, संकेतांचा संवाद जुळतो
विद्यापीठ नभोवाणीचा प्रवाह इथूनच दूरवर पोहोचतो
चित्र आणि स्वर यांचा येथे संगम साधतो
पुढचा संकेत याच प्रसारणाच्या दालनात दडतो

माती, जल, घटकांची इथे होते तपासणी
रसायनांच्या क्रियेत ज्ञानाची निर्मिती
शेतीच्या गणिताला विज्ञानाची जोड
प्रयोगशाळेत घडते उत्पादनाची पायवाट ठोस
नमुने तपासून ठरते योग्य प्रमाण
पुढचा संकेत दडलेला याच संशोधन स्थानात

संरक्षित छताखाली रंगांचा विस्तार दिसे
मोठ्या पाकळयांत सौंदर्याची वैज्ञानिक जपणूक असे
तापमान, आद्रतेचे अचूक संतुलन येथे
दीर्घ देठांवर उभे हास्य – व्यवसायाचे नवे नेते
ओळखा पाहू मी कोण या रंगी स्वप्नांत दडलेला
पुढचा संकेत इथेच – सुरक्षित वातावरणात रुजलेला

विद्याशाखेंच्या शिखरावर काळ्या पट्ट्यांची ओळ
सूर्यप्रकाशातून घडवते ऊर्जेचा कल्लोळ
ना धूर, ना आवाज, तरी शक्ती अपार
आकाशातून घेतो प्रकाश देतो विद्युत संचार
ओळखा पाहू मी कोण सूर्याशी नाते जोडतो
पुढचा संकेत इथेच – किरणांतून ऊर्जा घडवतो

अक्षरांपासून घडते इथे ज्ञानाची मांडणी
यंत्राच्या तालात चालते मुद्रण प्रक्रिया नित्यानी
साठवण, वितरण, क्रमबद्ध नियोजन
शिकणाऱ्या पर्यंत पोहोचते अभ्यासाची साधन
पृष्ठापासून शेवट इथेच पूर्ण प्रवास
पुढचा संकेत दडलेला याच्याच आसपास

**शब्दांकन:** तृप्ती पावडे व सर्व शैक्षणिक संयोजक,
विज्ञान विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

*समाप्त*